पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी
क्र फक्षेका/सभा /कावि/९८ /२०१६
दिनांक - २६/१२ /२०१६

**प्रति,**

मा.-----------------------------------
सदस्य,पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.प्रभाग समितीची विशेष सभा
दि. २९/१२/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.प्रभाग समितीची विशेष सभा दि. २९/१२/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षी शाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली आहे. तरी आपण सभेस उपस्थित राहावे, ही विनंती.

आपला विश्वासू ,

सही/-
प्रशासन अधिकारी
सचिव (सभाशाखा)
फ प्रभाग समिती

प्रत – संबंधित शाखाप्रमुख / विभागप्रमुख----------------------- विभाग

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## फ प्रभाग समिती
## कार्यपत्रिका क्रमांक ११

**दिनांक:- २९/१२/२०१६** **वेळ. दुपारी १२.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समितीची विशेष सभा दिनांक. २९/१२/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील " राजर्षी शाहु महाराज सभागृहात " सभागृहात आयोजित करणेत आली आहे.

सदर विशेष फ प्रभाग समिती सभेत खालील विषयाचा विचार करणेत येणार आहे.

अ) दिनांक ९/१२/२०१६ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक १०) कायम करणे

विषय क्र.१ प्रभाग क्र. १३ मधील विविध ठिकाणचे नामकरण करणेबाबत.

अ. सेक्टर नं – २२ येथील धोबी घाटाच्या जागेवर नव्याने उभारण्यात आलेल्या हॉलला **"डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम प्रशिक्षण केंद्र"** असे नामकरण करणेबाबत.

ब. पी सी एम सी कॉलनी येथील नुतनीकरण केलेल्या इमारतीमधील पहिल्या खोलीचे **"क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अंगणवाडी"** व दुस-या खोलीचे **"संत गाडगेबाबा महाराज आरोग्य निरीक्षक कार्यालय"** असे नामकरण करणेबाबत.

क. स्किम नं – ९ यमुनानगर येथे उभारण्यात आलेले खुले मैदानास **"सुवर्ण युग मित्र मंडळ व सांस्कृतिक कार्यालय"** असे नामकरण करणेबाबत.

मा. (चिखले)/ मराठे अश्विनी अजित यांचा प्रस्ताव

विषय क्र . २ प्रभाग क्र. ११ मधील खालील ठिकाणी झालेल्या कामास नामकरण करुन मिळावे

अ. स्पाईन रस्त्याच्या लगत असणा-या उदयानाला **" हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे"** असे नामकरण करणेबाबत.

ब. संजयनगर येथील समाजमंदीरास **" कै.सावित्रीबाई फुले समाजमंदीर"** असे नामकरण करणेबाबत

क. राजनगर येथील व्यायामशाळेस **"कै.मधुकर पवळे व्यायामशाळा"** असे नामकरण करणेबाबत.

ड. राजनगर (सी क्लस्टर) येथील समाजमंदीरास **"बालाजी समाजमंदीर"** असे नामकरण करणेबाबत.

इ. इंदिरानगर येथील समाजमंदीरास **"स्व.इंदिरा गांधी समाजमंदीर"** असे नामकरण करणेबाबत.

फ.राजनगर (डी क्लस्टर) येथील समाजमंदीरास **"लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाजमंदीर"** असे नामकरण करणेबाबत.

ग. मिलिंदनगर येथील मंदीरास **"मरिआई माता मंदीर"** असे नामकरण करणेबाबत.

मा.सौ संगिता शाम पवार यांचा प्रस्ताव

विषय क्र. ३ प्रभाग क्र. ५ मधील जाधववाडी या ठिकाणी **"श्री संत शिरोमणी सावता महाराज"** यांच्या नावाने स्वागत कमान उभारणे बाबत.
मा. सौ साधना रामदास जाधव यांचा प्रस्ताव

विषय क्र. ४ प्रभाग क्र. ५ मधील कुदळवाडी, जाधववाडी मधील बोल्हाईमळा चिखली मोशी शिवेजवळ **"स्वर्गीय निवृत्ती नारायण जाधव"** यांच्या नावाने स्वागत कमान स्वखर्चातून उभारणेस मान्यता मिळणेबाबत.
मा. सौ साधना रामदास जाधव यांचा प्रस्ताव

विषय क्र. ५ प्रभाग क्र.११ मधील विविध कामास नाव देणेबाबत.

अ. प्रभाग क्र. ११ मधील भक्ती शक्ती पासून यमुनानगर पोलिस चौकीकडे जाणा-या रस्त्यास **" भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशव्दार"** असे नामकरण करणेबाबत.

ब. छत्रपती संभाजीराजे क्रिडा संकुल येथील लॉन टेनिसच्या मैदानाला राजीव गांधी खेळरत्न पुरस्कार विजेते, अर्जुन अवॉर्ड, पदयश्री अवॉर्ड विजेता **" लिएंडर स्पेस लॉन टेनिस कोर्ट "** असे नामकरण करणेबाबत.
मा.सौ सुलभा रामभाऊ उबाळे यांचा प्रस्ताव

विषय क्र. ६ प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथील थरमॅक्स चौक, रोटरी चौक, साईमंगल चौक, एच डी एफ सी. चौक व शाहूनगर मधील अष्टविनायक चौक, महाबली चौक या चौकांचे सुशोभिकरणाचे काम श्रीमंत जगदगुरु साईबाबा प्रतिष्ठान सामाजिक संस्थे मार्फत करुन घेणेबाबत.
मा.सौ मंगलाताई अशोक कदम यांचा प्रस्ताव

विषय क्र. ७ प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथील नविन कमानीस **" धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज प्रवेशव्दार"** असे नामकरण करणेबाबत.
मा.सौ मंगलाताई अशोक कदम यांचा प्रस्ताव

विषय क्र. ८ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागाच्या सन २०१६ – २०१७ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेबाबत.(वाढ/घट र.रु ३,७०,०००/-)
मा. कार्यकारी अभियंता स्थापत्य यांचा प्रस्ताव

विषय क्र. ९ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागाच्या सन २०१६ – २०१७ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेबाबत. (वाढ/घट र.रु ३,९०,०००/-)
मा. कार्यकारी अभियंता स्थापत्य यांचा प्रस्ताव

विषय क्र. १० के. एस. बी. चौक ते कस्पटे वस्ती, वाकड या बी आर टी एस रस्त्यास **" कै. प्रल्हाद छाब्रिया (फिनोलेक्स इंडस्ट्रिज) "** यांचे नामकरण करणे व रस्त्यावर जागोजागी नावाचे फलक उभारणेस तसेच रस्त्याचे सुशोभीकरण करणेस मान्यता मिळणेबाबत.
मा.सौ ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांचा प्रस्ताव

विषय क्र. ११ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात येणा-या एकुण १० प्रभाग / वॉर्ड पैकी प्रभाग क्र. ९ संभाजीनगर व प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी पहिल्या टप्प्यात व प्रभाग क्र. ११ यमुनानगर दुस-या टप्प्यात तसेच तिस-या टप्पयात प्रभाग क्र १ रुपीनगर, प्रभाग क्र २ त्रिवेणीनगर , प्रभाग क्र ३ चिखली ,प्रभाग क्र – ५ जाधववाडी व प्रभाग क्र - १३ हगणदारीमुक्त जाहिर करणेस मान्यता देणेत आलेली आहे. मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/९६/२०१६, दिनांक १/४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पूर्वी टप्याटप्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे त्या अनुषंगाने फ क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ४ कृष्णानगर, प्रभाग क्र. १२ कै मधुकर पवळे हायस्कूल या वॉर्ड / प्रभागांमध्ये नागरिक उघड्यावर शौचास जात असल्याचे दिसून येत नाही. यास्तव **प्रभाग क्र. ४ कृष्णानगर, प्रभाग क्र. १२ कै. मधुकर पवळे हायस्कूल हे दोन** वॉर्ड/प्रभाग हगणदारीमुक्त जाहिर (Open Defecation Free) घोषीत करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणेबाबतचा मा.क्षेत्रीय अधिकारी यांचा प्रस्ताव

विषय क्र. १२ प्रभाग क्र. १ मधील खालील चौकांचे नामकरण करणेबाबत.

अ. वंदे मातरम चौका जवळ **" साई चौक "** असे नामकरण करणेबाबत.

ब. तळवडे येथील राजाशिवछत्रपती शाळेकडे जाणा-या रस्त्याला " **कै मा.महापौर मधुकर अण्णा पवळे मार्ग "** असे नामकरण करणेबाबत.

क. रुपीनगरच्या कमानी जवळच्या चौकाला " **स्व. भामाबाई हिरामण गरुड चौक "** असे नामकरण करणेबाबत.

मा.सौ पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे यांचा प्रस्ताव

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय,निगडी ४४
क्र.फक्षेका/सभा/कावि/९८/२०१६
दि. २६/१२/२०१६